राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०.

'STARS' प्रकल्पांतर्गत

# संकलित मूल्यमापन १ : २०२४-२५

## इयत्ता - सातवी : विषय - मराठी (प्रथम भाषा)

## उत्तरसूची

## उत्तरसूची व गुणदानाबाबत सूचना

| तोंडी | लेखी | एकूण गुण |
|---|---|---|
| १० | ५० | ६० |

| तोंडी चाचणी | | | |
|---|---|---|---|
| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
| प्र. १) | **खालील उतारा वाच व त्यावर आधारित कोणतेही पाच प्रश्न तयार करून सांग.** | 07.01.03 | ५ |
| | • परिच्छेदावर आधारित समर्पक असे पाच प्रश्न सांगितल्यास प्रत्येक प्रश्नास १ गुण द्यावा. उदा. कुठून आलास? (प्रसंगासंदर्भाने अधिक आकलनाचे प्रश्न अपेक्षित आहेत.) | | |
| प्र. २) | **खालील शब्दांना तुझ्या बोलीभाषेत इतर कोणते शब्द वापरतात ते सांग.** | 07.01.04 | २ |
| | १) गवसलं : सापडलं, घावलं<br>२) डोईवर : डोक्यावर, माथ्यावर<br>अशा प्रकारे विद्यार्थ्याने त्याच्या स्थानिक परिसरातील योग्य पर्यायी शब्द सांगितल्यास प्रत्येक शब्दास १ गुण द्यावा. | | १<br>१ |
| प्र. ३) | **इयत्ता सातवीच्या पाठ्यपुस्तकातील तुला आवडणारी कविता तालासुरात व साभिनय सादर कर.** | 07.01.18 | ३ |
| | • तालासुरात व साभिनय गायन करता येणे अपेक्षित आहे.<br>• एकेका विद्यार्थ्याला पुढे बोलावून कवितेचे साभिनय गायन करून घ्यावे.<br>• कवितेचे गायन करण्यासाठी पुरेसा वेळ द्यावा.<br>• विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीची कविता म्हणण्याचे स्वातंत्र्य द्यावे.<br>कविता साभिनय, योग्य आरोह-अवरोहासह चालीत म्हटल्यास ३ गुण द्यावेत.<br>चालीचा व आरोह - अवरोहाचा विचार न करता कविता म्हटल्यास २ गुण द्यावेत.<br>अर्धीच कविता म्हटल्यास १ गुण द्यावा. | | ३<br>२<br>१ |

| लेखी चाचणी | | | |
|---|---|---|---|
| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
| प्र. ४) | **खालील उतारा वाच व त्याखालील प्रश्नांची उत्तरे लिही.** | 07.01.01 | ४ |
| | **अ)** वरील उताऱ्यात दिलेल्या वर्णनावरून गटात न बसणाऱ्या शब्दास (○) कर.<br>इंद्रधनुष्य या गटात न बसणाऱ्या शब्दास गोल केल्यास १ गुण द्यावा. | | १ |
| | **आ)** उताऱ्याच्या आधारे थंडीची लाट बंदिस्त करणारी कोणतीही एक गोष्ट लिही.<br>मफलर, कनटोपी, स्वेटर यांपैकी कोणतीही एक गोष्ट लिहिल्यास १ गुण द्यावा. | | १ |
| | **इ)** तुझा आवडता ऋतू कोणता? सकारण लिही.<br>मुक्तोत्तरी कृती. आवडता ऋतू लिहिल्यास व कारणासह लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>केवळ आवडता ऋतू लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>केवळ कारण लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| प्र. ५) | **खालील चित्र पाहा व चित्राचे वर्णन तुझ्या शब्दांत लिही.** | 07.01.02 | ४ |
| | चित्रास समर्पक अशी योग्य वाक्यरचना व शुद्धलेखनासह<br>• ७ ते ८ वाक्ये लिहिल्यास ४ गुण द्यावेत.<br>• ५ ते ६ वाक्ये लिहिल्यास ३ गुण द्यावेत.<br>• ३ ते ४ वाक्ये लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>• १ ते २ वाक्ये लिहिल्यास १ गुण द्यावा. | | ४<br>३<br>२<br>१ |
| प्र. ६) | **खाली दिलेल्या घटनांची तुलना कर व लिही.** | 07.01.06 | ४ |
| | ओला दुष्काळ : पूरस्थिती निर्माण होते/पूर येतो. अति पावसामुळे पिकांची नासाडी होते. जनजीवन विस्कळीत होते.<br>कोरडा दुष्काळ : पाऊस पडत नाही. पिके जळून जातात.<br>वरीलप्रमाणे समर्पक मुद्दे लिहिल्यास.<br>दोन्ही प्रकारांचे दोन-दोन मुद्दे लिहिल्यास ४ गुण द्यावेत.<br>दोन्ही प्रकारांत मिळून तीन मुद्दे लिहिल्यास ३ गुण द्यावेत.<br>दोन्ही प्रकारांचा एक-एक मुद्दा लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>दोन्ही प्रकारांपैकी फक्त १ मुद्दा लिहिल्यास १ गुण द्यावा. | | ४<br>३<br>२<br>१ |
| प्र. ७) | **तुझ्या शाळेत 'आजी-आजोबा दिन' साजरा करायचा आहे. त्यासंदर्भात खाली काही मुद्दे दिले आहेत ते वाच व त्याबद्दल तुझे विचार लिही.** | 07.01.07 | ५ |
| | अ) तर्क करून आजी-आजोबांच्या मनातील भावना लिहिणे अपेक्षित आहे जसे - त्यांना आनंद वाटेल. त्यांना माझा अभिमान वाटेल. अशा आशयाची समर्पक उत्तरे स्वीकारावीत. | | २ |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| | • दोन भावना लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>• एक भावना लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>आ) कार्यक्रमाबद्दल सर्मपक उत्तरे स्वीकारावीत.<br>• दोन कार्यक्रमांची नावे लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>• एका कार्यक्रमाचे नाव लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>इ) स्वत:चे विचार<br>एका वाक्यात समर्पक उत्तर लिहिल्यास १ गुण द्यावा. | | <br><br>२<br><br><br>१ |
| प्र. ८) | **कवितेचे वाचन करून खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** | 07.01.09 | ६ |
| | **अ)** खालील शब्दांचे तुला माहीत असणारे अर्थ लिही.<br>१) घोव – या शब्दाचे नवरा, पती यासारखे समर्पक अर्थ लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>२) शीड – या शब्दाचा होडीला दिशा दाखवण्यासाठी डोलकाठीला गुंडाळलेले कापड यासारखा समर्पक अर्थ लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>(वरील शब्दांचे माहीत असणारे विद्यार्थ्यांनी बोलीभाषेतील शब्द लिहिल्यास ते स्वीकारावेत.)<br>वरीलपैकी कोणत्याही एका शब्दाचा अर्थ लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>**आ)** खालील वाक्यांचा अर्थ सांगणारी कवितेतील ओळ शोधून लिही.<br>काळजात त्यांच्या भरली शहाळी<br>कवितेतील वरील ओळ लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>**इ)** कवितेतील यमक जुळणाऱ्या शब्दांच्या कोणत्याही दोन जोड्या लिही.<br>१) नाखवा – दाखवा, २) खाडी – झाडी, ३) भोळी – शहाळी,<br>४) ताटवा – मापवा – टकवा, ५) साऱ्या–वाऱ्या<br>वरीलपैकी कोणत्याही दोन जोड्या लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>एक जोडी लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>**ई)** अबोली फुलांच्या ताटव्यासाठी कवितेत आलेले विशेषण लिही.<br>फुलांच्या ताटव्यासाठी 'भगवा' हे विशेषण लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २<br><br><br><br><br><br><br><br>१<br><br><br>२<br><br><br><br><br>१ |
| प्र. ९) | **सूचनेनुसार उत्तरे लिही.** | 07.01.14 | ५ |
| | **अ)** वरील वाक्यांत 'मार्गाने जाणे' या अर्थाचा कोणता वाक्प्रचार आला आहे ते खालील पर्यायातून शोध व लिही.<br>दिलेल्या पर्यायातून शोधून क्र. (२) वाटेला लागणे हा वाक्प्रचार लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>**आ)** पुढील वाक्यात योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर कर व वाक्य पुन्हा लिही.<br>तो बाहेर पडणार, तोच राजाला नेमकी जाग आली. | | १<br><br><br>२ |

| प्र. क्र. | योग्य उत्तरे व सूचना | अध्ययन निष्पत्ती क्र. | गुणदान |
|---|---|---|---|
| | योग्य ठिकाणी विरामचिन्हांचा वापर करून वाक्य लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>एक विरामचिन्ह दिल्यास १ गुण द्यावा.<br>**इ)** खाली दिलेल्या चौकटीतील म्हण ओळखून लिही व त्या म्हणीचा उपयोग करून एक वाक्य तयार कर.<br>उथळ पाण्याला खळखळाट फार ही म्हण लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>म्हणीचा वापर करून वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २ |
| प्र. १०) | **बस चालकाची मुलाखत घेण्यासाठी खालील मुद्द्यांच्या साहाय्याने पाच प्रश्नांची प्रश्नावली तयार कर.** | 07.01.24 | ५ |
| | • बस चालकाच्या कामाची माहिती मिळवण्यासाठी मुलाखत घेण्यासाठी दिलेल्या मुद्द्यांनुसार समर्पक ५ प्रश्न तयार केल्यास ५ गुण द्यावेत.<br>प्रत्येक प्रश्नाकरिता १ गुण याप्रमाणे गुण द्यावेत. | | ५ |
| प्र. ११) | **खाली दिलेल्या शब्दांचे समानार्थी शब्द ओळखून शब्दकोडे पूर्ण कर.** | 07.01.25 | ६ |
| | १) माता २) तारीख ३) खग ४) गगन ५) नयन ६) नवल<br>एका अचूक शब्दास १ गुण याप्रमाणे गुण द्यावेत. | | |
| प्र. १२) | **पूरपरिस्थिती नियंत्रित होणारी दोन कारणे व दोन उपाय लिही.** | 07.01.26 | ४ |
| | • पूरपरिस्थिती नियंत्रित करणारी दोन समर्पक कारणे लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>एक कारण लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>• पूरपरिस्थिती नियंत्रित करणारे दोन समर्पक उपाय लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>एक उपाय लिहिल्यास १ गुण द्यावा. | | २<br><br>२ |
| प्र. १३) | **खालील प्रश्नांची उत्तरे लिही.** | 07.01.27 | ७ |
| | **अ)** दिलेल्या क्रियाविशेषण अव्ययापासून वाक्य तयार कर.<br>दिलेल्या क्रियाविशेषण अव्ययापासून दोन योग्य वाक्य लिहिल्यास २ गुण द्यावेत.<br>एक योग्य वाक्य लिहिल्यास १ गुण द्यावा.<br>**आ)** 'समोर' हे शब्दयोगी अव्यय वापरून अर्थपूर्ण वाक्य तयार कर.<br>'समोर' हे अव्यय वापरून अर्थपूर्ण वाक्य तयार केल्यास १ गुण द्यावा.<br>**इ)** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे सरळरूप व सामान्यरूप ओळख व लिही.<br>सरळरूप - मैदान सामान्यरूप - मैदाना/मैदानां<br>**ई)** खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांचे शब्दयोगी अव्यय ओळख व लिही.<br>१) टेबलावर - वर या उत्तरास १ गुण द्यावा.<br>२) तुमच्याकडून - कडून या उत्तरास १ गुण द्यावा. | | २<br><br>१<br><br>२<br><br>२ |

■■■